राज्यस्तरीय कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत कुशल मनुष्यबळ निर्मितीचे प्रशासकीय विभागनिहाय उद्दिष्टांची पुर्ननिश्चिती करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.कौविका-२०१२/(१०८/२०१२)/व्यशि-५
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ११ ऑक्टोंबर, २०१२.

पहा:- १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविका-२०१२/(३८/१२)/व्यशि-५, दिनांक २२/०५/२०१२.
२. मा.मुख्य सचिव महोदय यांच्या अध्यक्षतेखाली कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत Core Group च्या दिनांक १९/०६/२०१२ रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.
३. मा.प्रधान सचिव (उवतंशि) यांच्या अध्यक्षतेखाली कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत दिनांक ०६/०७/२०१२ रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.
४. मंत्रीमडळ सचिव, नवी दिल्ली यांचे दिनांक ०७/०५/२०१२ रोजीचे अर्ध शासकीय पत्र.
५. मा.पंतप्रधानांचे सल्लागार श्री.एस.रामादोराई यांचे अर्ध शासकीय पत्र क्र. 27004/06/2012-Adv (PM) NSDC, dated 23rd May, 2012.
६. राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेचे कार्यकारी संचालक यांचे अर्ध शासकीय पत्र क्र. 41001/01/2012-Adv (PM) NSDC, dated 7th June, 2012.
७. राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेचे कार्यकारी संचालक यांचे अर्ध शासकीय पत्र क्र. 41001/01/2012-Adv (PM) NSDC, dated 28th June, 2012.

**प्रस्तावना-** विभागाच्या दिनांक २२ मे २०१२ च्या शासन निर्णयानुसार राज्यासाठी विभागनिहाय प्रतिवर्षी ४५ लाख कुशल मनुष्यबळ निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

२. मा.मुख्य सचिव महोदयांनी कौशल्य विकास कार्यक्रमाच्या आढावा संदर्भातील दिनांक १९ जून २०१२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रशासकीय विभागांना निश्चित केलेल उद्दिष्टांची पुर्नविचार करण्यात यावे असे निर्देश दिले होते. त्यानुसार मा.प्रधान सचिव (उवतंशि) यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात दिनांक ०६/०७/२०१२ रोजी या विषयाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत कौशल्य विकास कार्यक्रमाशी संबंधित विभागांशी सविस्तर चर्चा होऊन विभागनिहाय निर्माण होऊ शकणारे कुशल मनुष्यबळ लक्षात घेऊन सुधारीत मनुष्यबळ निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

३. मंत्रीमंडळ सचिव, नवी दिल्ली यांच्या दिनांक ०७/०५/२०१२ च्या पत्रामध्ये १२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये राष्ट्रीय पातळीवर ८.०० कोटी एवढे कुशल मनुष्यबळाचे उद्दिष्ट ठरविले असून

जनगणना २०११ च्या आधारे महाराष्ट्र राज्यासाठी ७४.२८ लाख एवढे कुशल मनुष्यबळाचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले आहे. राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेचे कार्यकारी संचालक यांच्या दिनांक ०७/०६/२०१२ च्या पत्रामध्ये देशाच्या एकूण लोकसंख्येमध्ये ४ कोटीपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ११ राज्यांकडून ८० % कुशल मनुष्यबळ निर्मितीची जबाबदारी असल्याचे नमुद करण्यात आले आहे. तसेच मा.पंतप्रधानांचे सल्लागार श्री रामादोराई यांच्या दिनांक २३/०५/२०१२ च्या पत्रामध्ये १२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये राष्ट्रीय पातळीवर ८.०० कोटी एवढे कुशल मनुष्यबळाचे उद्दिष्ट ठरविले असून महाराष्ट्र राज्यासाठी ७४.२८ लाख व सन २०१२-१३ साठी ७.९ लाख कुशल मनुष्यबळाचे उद्दिष्ट ठरविले आहे असे नमुद करण्यात आले आहे.

४. कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावरील प्रतिवर्षी ४५ लाख कुशल मनुष्यबळ निर्मितीच्या उद्दिष्टांमध्ये सुधारणा करुन प्रशासकीय विभागांना सुधारीत उद्दिष्ट निश्चित करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णयः-** संदर्भ क्रमांक १ मधील दिनांक २२ मे २०१२ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावरील प्रतिवर्षी ४५ लाख कुशल मनुष्यबळ निर्मितीच्या

## कौशल्य विकास कार्यक्रम २०१२--१३

| अ क्र | जिल्हा | प्राप्त निधी रु लाखात | झालेला खर्च रु लाखात | समर्पित रक्कम रु लाखात |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | 4 | ५ |
| 1 | मुबई शहर | 0 | 0 | 0 |
| 2 | मुबई उपनगर | 0 | 0 | 0 |
| 3 | रायगड | 100.91 | 0 | 100.91 |
| 4 | ठाणे | 300.00 | 0 | 300.00 |
| 5 | रत्नागिरी | 0.50 | 0.20 | 0 |
| 6 | सिंधुदुर्ग | 300.00 | 0 | 300.00 |
| | मुबई विभाग | | | |
| 7 | पुणे | 22.50 | 22.50 | 0 |
| 8 | कोल्हापूर | 300.00 | 0 | 300.00 |
| 9 | सातारा | 0 | 0 | 0 |
| 10 | सागली | 300.00 | 0 | 300.00 |
| 11 | सोलापूर | 300.00 | 0 | 300.00 |
| | पुणे विभाग | | | |
| 12 | नाशिक | 0 | 0 | 0 |
| 13 | धुळे | 0 | 0 | 0 |
| 14 | जळगांव | 0 | 0 | 0 |
| 15 | अहमदनगर | 0 | 0 | 0 |
| 16 | नंदुरबार | 0 | 0 | 0 |
| | नाशिक विभाग | | | |
| 17 | औरंगाबाद | 0 | 0 | 0 |
| 18 | हिंगोली | 300.00 | 0 | 300.00 |
| 19 | परभणी | 0.00 | 0 | 0 |
| 20 | बीड | 100.1 | 0 | 100.1 |
| 21 | जालना | 300.19 | 0 | 300.19 |
| 22 | उस्मानाबाद | 300.00 | 0 | 300.00 |
| 23 | लातूर | 0 | 0 | 0 |
| 24 | नांदेड | 0 | 0 | 0 |
| | औरंगाबाद विभाग | 0 | 0 | 0 |
| 25 | अमरावती | | | |
| 26 | वाशिम | 5.00 | 0 | 5.00 |
| 27 | अकोला | 0 | 0 | 0 |
| 28 | यवतमाळ | 0 | 0 | 0 |
| 29 | बुलढाणा | 300.00 | 0 | 300.00 |
| | अमरावती विभाग | | | |
| 30 | नागपूर | 300.00 | 0 | 300.00 |
| 31 | वर्धा | 200.00 | 0 | 200.00 |
| 32 | गडचिरोली | 200.45 | 0.16 | 0.00 |
| 33 | चंद्रपूर | 0 | 0 | 0 |
| 34 | भंडारा | 300.00 | 0 | 300.00 |
| 35 | गोंदिया | 0 | 0 | 0 |
| | विमु नागपूर एकुण | | | |